संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : १०४ वा ● ● शनिवार दि. २४ फेब्रुवारी २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025



एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

श्राव्या डायग्नोस्टिक्स

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

उपलब्ध सुविधा

डॉ.सौ. चैताली सत्तेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. सत्तेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M..S.)

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

# शिवसेनेचा 'कोहिनूर' अनंतात विलीन

## मनोहर जोशी यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना महाराष्ट्र सरकारच्या वतीने मानवंदना देण्यात आली. त्यानंतर त्यांच्या पार्थिवावर मुंबईमधील दादर स्मशानभूमीत काल (दि.२३) सायंकाळी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी महाराष्ट्रचे ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत, काँग्रेचे ज्येष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, शिंदे गटाचे मंत्री शंभुराज देसाई, शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्यासह अनेक पक्षांचे राजकीय नेते शिवसेना कार्यकर्ते आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि लोकसभेचे माजी अध्यक्ष मनोहर जोशी यांचे शुक्रवारी वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झाले. मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. बुधवारी २१ फेब्रुवारी रोजी त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज पहाटे ३ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

मनोहर जोशी यांना याआधी म्हणजेच २४ मे २०२३ रोजी ब्रेन हॅमरेजचा त्रास झाला होता. त्यांच्या मेंदूत रक्तस्त्राव झाला होता, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली होती. त्यावेळी जवळपास महिनाभर जोशी यांच्यावर रूग्णालयात उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना रूग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता. आता परत एकदा त्यांना रूग्णलयात दाखल करण्यात आले होते. बुधवारी दुपारी तीन वाजता हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांना हिंदुजा रूग्णालयात दाखल केले होते अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते.

राज्याचे माजी मुख्यमंत्री, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते मनोहर जोशी यांचे पार्थिव काल (दि.२३) सकाळी ११ ते २ या वेळेत माटुंगा पश्चिम येथील रुपारेल कॉलेज येथील त्यांच्या सध्याच्या निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. दुपारी २ वाजता त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. त्यानंतर त्यांच्या पार्थिवावर दादर स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.



मुंबई : शिवसेनेचे ज्येष्ठ नेते मनोहर जोशी यांच्यावर मुंबईमधील दादर स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

**संकट काळातही शिवसेनेबरोबर राहिले : उद्धव ठाकरे**

मनोहर जोशी सच्चे शिवसैनिक होते. बेळगाव-कारवार सीमा आंदोलनात बाळासाहेब ठाकरे यांना अटक झाली, तेव्हा त्यांच्यासह मनोहर जोशी आणि दत्ता साळवीही होते. जीवाला जीव देणारे निष्ठावंत शिवसैनिक आपल्यातून निघून जात आहेत, हे आपले दुर्दैव आहे. मनोहर जोशी पहिल्या फळीतील शिवसैनिक होते. जोशी यांच्यासारख्या जीवाला जीव देणाऱ्या शिवसैनिकांमुळे शिवसेना अनेक संकटावर मात करून वेळोवेळी उभी राहिली.

**बाळासाहेबांचं स्वप्न मनोहर जोशींच्या रूपाने पूर्ण : राज ठाकरे**

मनोहर जोशी सरांचं निधन झालं. बाळासाहेबांनी शिवसेना स्थापन केल्यापासून त्यांच्या सोबतच्या पहिल्या फळीतील ते ज्येष्ठ नेते. शिवसेनेची धाटणीच आक्रमक, पण त्यात अजातशत्रुत्व जपत सरांची राजकीय वाटचाल सुरु राहिली. शिवसैनिकाला मुख्यमंत्रिपदावर बसवण्याचं बाळासाहेबांचं स्वप्न होतं जे मनोहर जोशींच्या रूपाने पूर्ण झालं. पुढे ते लोकसभा अध्यक्ष झाले आणि नंतर शेवटच्या श्वासापर्यंत बाळासाहेबांचे सैनिक म्हणून राहिले. १९६६ पासून शिवसेनेचा धगधगता इतिहास पाहिलेले आणि जगलेले एक शिवसैनिक, नेते आज काळाच्या पडद्याआड गेले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे मनोहर जोशी सरांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# टेंभू योजनेच्या वंचित बारा गावातील निविदा प्रक्रियेला मंजुरी

## श्रमिक मुक्ती दल व समान पाणी वाटप पाणी संघर्ष चळवळीचे आंदोलन स्थगित

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** श्रमिक मुक्ती दल व समान पाणी वाटप पाणी संघर्ष चळवळ यांच्या वतीने डॉ. भारत पाटणकर व आनंदराव पाटील, जनार्दन झिंबल, हणमंतराव देशमुख, साहेबराव चवरे, सादिक खाटीक, मनोहर विभुते व इतर सर्वप्रमुख चळवळीचे नेते यांच्या नेतृत्वाखाली आटपाडी तालुक्यातील वंचित १२ गावातील बंद पाइपलाईनचे काम तातडीने होण्यासाठी निविदा काढाव्यात व कामाच्या निविदा प्रसिद्ध कराव्यात या मागणीसाठी साठी दिनांक २५ फेब्रुवारी २०२४ रोजी आंदोलनाचे नियोजन केले होते. त्याबाबतचे निवेदन उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री तसेच तहसीलदार आटपाडी आणि अधिकारी यांना दिले होते.



डॉ. भारत पाटणकर

या आंदोलनाची दखल घेऊन महाराष्ट्र सरकारने सर्व मागण्या पूर्ण करून कामाच्या निविदा प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया चालू केली आहे. जलसंपदा विभागाने डॉ. भारत पाटणकर यांना लेखी पत्र देऊन मागणी मान्य झाल्याने आंदोलन स्थगित करावे अशी विनंती केली आहे. शासनाच्या लेखी पत्रामुळे आंदोलनाला मोठे यश मिळाले आहे.

टेंभू योजनेच्या निविदा प्रक्रियेला मंजुरी मिळाल्यामुळे आटपाडी तालुक्यातील वंचित बारा गावातील शेतकऱ्यांना न्याय मिळालेला आहे. वंचित १२ गावातील शेतकऱ्यांच्या वतीने पाणी संघर्ष चळवळीचे नेते डॉ. भारत पाटणकर यांचे अभिनंदन करण्यात आले. सोमवार दिनांक ४ मार्च २०२४ रोजी सायंकाळी ४ वा. लिंगीवरे येथे शेतकऱ्यांचा विजयी मेळावा घेण्याचे नियोजन केले आहे शेतकरी बांधवांनी उपस्थित रहावे अशी विनंती करण्यात आली आहे.

# सरकारने आरक्षण दिले, आता जरांगेंनी अट्टहास सोडावा : देवेंद्र फडणवीस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नागपूर :** मराठा समाजाला आरक्षण देताना इतर समाजाचे आरक्षण काढणार नाही असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आधीच स्पष्ट केले होते. ओबीसींचे आरक्षण अबाधित ठेवत मराठा समाजाला सरकारने आरक्षण दिले आहे. त्यामुळे ओबीसी समाजात समाधान तर मराठा समाजात आनंद व्यक्त केला जात आहे. त्यामुळे आता जरांगेंनी अट्टहास सोडावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



मनोज जरांगे



देवेंद्र फडणवीस

फडणवीस म्हणाले, मराठा समाजाला आरक्षण सरकारने दिले आहे. त्यामुळे कोणीही जनतेला त्रास होईल असे आंदोलन करू नये. जरांगे पाटील यांना याबाबत सांगण्यात आले असून त्यांनी आता आंदोलनाचा अट्टाहास सोडावा. आरक्षणाबाबत न्यायालयाने काय म्हटले मला माहिती नाही, असेही ते म्हणाले.

नागपुरात पर्नोड रिकार्डसमवेत सामंजस्य करार होणार असून त्या कार्यक्रमासाठी आलो आहे. जवळपास २५ हजार कोटींचे करार होणार आहेत. पस्तीस हजार एकरातील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. रोजगाराची निर्मिती होणार आहे, त्यामुळे हा महत्त्वाचा प्रकल्प असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# पुणे विभागस्तरीय नमो महारोजगार मेळाव्यासाठी २० हजारापेक्षा जास्त रिक्त पदे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत येत्या २ मार्च रोजी बारामती येथे आयोजित मेळाव्यामध्ये पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक तसेच इतर सेवा क्षेत्रातील सुमारे १२० पेक्षा जास्त खाजगी उद्योजकांनी आत्तापर्यंत सहभाग दर्शविला असून त्यांच्याकडून विविध प्रकारची सुमारे २० हजार पेक्षा जास्त रिक्तपदे कळविण्यात आली आहेत, अशी माहिती कौशल्य विकास विभागाच्या उपआयुक्त अनुपमा पवार यांनी दिली आहे.





या मेळाव्याचे विद्या प्रतिष्ठानचे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, बारामती येथे आयोजन करण्यात आले आहे. या पदांकरीता १० वी, १२ वी, कोणत्याही शाखेतील पदवीधर अथवा पदविकाधारक, पदव्युत्तर पदवी, आयटीआय, अभियांत्रिकी पदवी इत्यादी पात्रता असणारे स्त्री-पुरुष उमेदवार पात्र असणार आहेत.

ज्या उद्योजक आस्थापनांना मनुष्यबळाची आवश्यकता आहे त्यांनी आपल्या उद्योग आस्थापना https://rojgar.mahaswayam.gov.in//employeršregistration या लिंकवर नोंदणी करुन रिक्तपदे मेळाव्यासाठी अधिसुचित करावीत. नोकरी इच्छूक उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in//register या संकेतस्थळावर आपली नावनोंदणी करावी.

या महारोजगार मेळाव्यात विविध विभागाच्या योजनांची, स्टार्टअप व विविध महामंडळे यांच्याव्दारे स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य देणाऱ्या योजनांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच मेळाव्यात अल्पमुदतीचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थादेखील सहभागी होणार असल्याने कौशल्य प्रशिक्षणास इच्छूक उमेदवारांना याचा लाभ घेता येईल. उमेदवारांनी मेळाव्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष मुलाखतीस येताना सर्व शैक्षणिक कागदपत्रे, पासपोर्ट आकाराची छायाचित्रे, आवश्यकतेनुसार अर्जाच्या (रिज्युम) व आधारकार्डच्या प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. या संधीचा जास्तीत जास्त उमेदवारांनी व आस्थापनांनी लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी पुणे विभागातील संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे संपर्क साधावा, असेही श्रीमती पवार यांनी कळविले आहे.

# मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय सुट्टीच्या दिवशी चालू राहणार

**णदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** अभय योजना २०२३ पहिल्या टप्यात १ जानेवारी १९८० ते ३१ डिसेंबर २००० या कालावधीत निष्पादीत झालेल्या दस्तऐवजांसाठी देय होणारी मुद्रांक शुल्क रक्कम १ लाखापर्यंत असल्यास मुद्रांक शुल्क व दंडाच्या रकमेस माफी, मुद्रांक शुल्क १ लाखाच्या वर असल्यास मुद्रांक शुल्कात ५० टक्के व दंडाची संपूर्ण सूट देण्यात आली आहे. तसेच १ जानेवारी २००१ ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीत निष्पादीत झालेल्या दस्तऐवजांसाठी देय होणारी मुद्रांक शुल्क मुद्रांक शुल्काची रक्कम २५ कोटीपर्यंत असल्यास मुद्रांक शुल्कात २५ टक्के माफी व दंडामध्ये ९० टक्के सुट, मुद्रांक शुल्काची रक्कम २५ कोटीपेक्षा जास्त असल्यास २० टक्के माफी तसेच १ कोटी रूपये रक्कम दंड स्वीकारुन उर्वरित दंडाच्या रकमेत सूट देण्यात आली आहे.

नोंदणी व मुद्रांक विभाग
महाराष्ट्र शासन

ही योजना ३१ जानेवारी २०२४ पर्यंत होती, मात्र शासनाकडून उपरोक्त योजनेची पहिल्या टप्याची मुदतवाढ दि. २९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत दिली असल्याने या जिल्ह्यातील दुय्यम निबंधक श्रेणी १ व सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कार्यालये दि. २४ व २५ फेब्रुवारी रोजी म्हणजेच शनिवार व रविवार सुट्टीच्या दिवशी सुरू राहणार आहेत. तरी या योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे यांनी केले आहे.

# पेड न्यूजबाबत ऑनलाईन प्रशिक्षण संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडिया, प्रिंट मीडियाद्वारे प्रसिद्ध होणाऱ्या पेड न्यूजबाबत राज्यातील सर्व एमसीएमसी कमिटी म्हणजेच पर्यायांने जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनी अधिक सजग राहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी डॉ.स्नेहल कनिचे यांनी केले.





मुख्य निवडणूक कार्यालयातील माध्यम देखरेख व नियंत्रण कक्षातील अधिकारी व राज्यातील सर्व जिल्हा माहिती अधिकारी यांचे सकाळी ११ ते दुपारी १:३० या वेळेत राज्यस्तरीय ऑनलाईन प्रशिक्षण आज श्रीमती कनिचे यांनी छखउ (सांगली ) कक्ष येथे घेतले.

यावेळी मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या, निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी जिल्हा माहिती अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनी निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवरील सक्सेस स्टोरींना व्यापक प्रसिद्धी द्यावी. त्याचबरोबर निवडणूक कालावधीमध्ये पार पडणाऱ्या पाच पत्रकार परिषदांबाबत दक्ष असावे. मतदान जनजागृतीबाबत विविध लेखांद्वारे मतदान वाढविण्यासाठी आवाहन करावे, असे सांगून उमेदवारांकडून निवडणुकीबाबत कायद्याचे उल्लंघन झाल्यास त्यांच्यावर कोणकोणत्या कलमांद्वारे निवडणूक आयोगामार्फत कारवाई केली जाऊ शकते याचा उहापोह केला.

या ऑनलाइन (दूर दृष्यप्रणाली ) प्रशिक्षणासाठी मुंबई येथील आय .टी . सेलचे नोडल ऑफिसर श्री. पाटकर तसेच आयोगाचे उप निवडणूक अधिकारी शरद दळवी यांच्यासह राज्यातील सर्व जिल्हाचे माहिती अधिकारी उपस्थित होते.

# आमदार राजेंद्र पाटणी यांचे दीर्घ आजारामुळे निधन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**वाशीम :** वाशिम जिल्ह्यातील कारंजा विधानसभा मतदारसंघाचे भाजपा आमदार राजेंद्र पाटणी यांचे दीर्घ आजारामुळे आज निधन झाले. मुंबईमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. आमदार राजेंद्र पाटणी हे वाशीम जिल्ह्यातील भाजपचे एक अभ्यासू नेतृत्व होते.



शिवसेनेकडून पाटणी यांनी विधान परिषद सदस्य आणि विधानसभा सदस्य म्हणून काम केले होते. २०१४ मध्ये त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आणि भाजपाकडून देखील ते कारंजा-मानोरा मतदारसंघातूम निवडून आले होते. पाटणी यांनी यापूर्वी शिवसेनेच्या तिकिटावर विजय संपादन केला होता. त्यानंतर 'मोदी लाटेत' त्यांनी भाजपात प्रवेश करत वाशिम जिल्हाध्यक्षपदासह आमदारकी मिळवली. मागच्या दोन-तीन वर्षांपासून ते आजारी असल्यामुळे मतदारसंघात त्यांचे सुपूत्र ज्ञानक पाटणी यांचा वाढता सहभाग चर्चेचा विषय बनला आहे. अनेक विकास कामाचे भूमिपूजन देखील ज्ञानक पाटणी कडून होत असून २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत ते भाजप चा चेहरा राहतील का ? यावरून चर्चेला उधाण आले आहे.

# मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी यंत्रणांनी कसोशीने प्रयत्न करावेत : डॉ.राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** आगामी निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्व यंत्रणांनी कसोशीने व नियोजनबध्द प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.राजा दयानिधी यांनी केले.

जिल्हा स्वीप समिती कामकाज अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. बैठकीस अतिरिक्त पोलीस अधिक्षक रितू खोखर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी निता सावंत-शिंदे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) दीपक शिंदे, जिल्हा पुरवठा अधिकारी आशिष बारकुल, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, नोडल अधिकारी स्वीप तथा जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) शशिकांत शिंदे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विश्वास वेताळ यांच्यासह गटविकास अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



सांगली : जिल्हा स्वीप समिती कामकाज अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीस उपस्थित अतिरिक्त पोलीस अधिक्षक रितू खोखर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी निता सावंत-शिंदे व उपस्थित अधिकारी

जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी म्हणाले, यापूर्वीच्या निवडणुकीत सरासरीपेक्षा कमी मतदान झालेल्या मतदान केंद्रावर विशेष लक्ष देवून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रत्येक बुथवर, तालुकास्तर व जिल्हास्तर विविध उपक्रमांव्दारे जनजागृती करावी. याबाबतचा सविस्तर आराखडा तयार करावा. सर्व आस्थापनांनी त्यांच्याकडील कर्मचाऱ्यांची मतदार नोंदणी आहे का ते तपासावे. सर्व तालुक्यात कलापथकाव्दारे तसेच शहरी व ग्रामीण भागात घंटागाडी वरून मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या अनुषंगाने जनजागृती करावी. मतदान यंत्राबाबतही जनजागृती करावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी उप जिल्हा निवडणूक अधिकारी निता सावंत-शिंदे, उपजिल्हाधिकारी दीपक शिंदे यांनीही मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्याबाबत सूचना केल्या. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) शशिकांत शिंदे यांनी स्वीप कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांबाबत यावेळी सविस्तर माहिती दिली.

# संपादकीय

## बिगर काँग्रेसचे पहिले मुख्यमंत्री मनोहर जोशी

मनोहर जोशी यांना राजकारणात कोणताही वारसा नव्हता. सुरुवातीच्या काळात त्यांनी अनेक व्यवसाय केले. त्यातील काही यशस्वी झाले. त्यांनी राजकारणात प्रवेश करताना सुद्धा योग्य वेळ साधली अन राज्यात पहिले बिगर काँग्रेसचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. परंतु त्यांचे काल दिनांक २३ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले.

मनोहर जोशी यांचा जन्म रायगड जिल्ह्यातल्या नांदवे गावचा. त्यांचे मुळे गाव बीड जिल्ह्यात. परंतु त्यांचे कुटुंब रायगड जिल्ह्यात स्थलांतरित झालं आणि पुढे मनोहर जोशी शिक्षणाच्या निमित्ताने मुंबईत आले. घरची श्रीमंती वगैरे प्रकार नव्हता. घरात भिक्षुकीचा व्यवसाय होता. शिक्षण घ्यायचं आणि कुठेतरी नोकरी करायची असा सरळ साधा मराठी मुलांसारखे मनोहर जोशी यांचे स्वप्न होते. मनोहर जोशी व्हरण्याकूलरची परीक्षा पास झाले. ही परीक्षा पास झाल्यावर जोशी सरांनी शिक्षकाची नोकरी स्वीकारली. महिना पन्नास रुपये पगार आणि त्यातून खर्च भागवायचे आणि राहिलेल्या पगारातून शिक्षणाची सोय करायचे.

त्यानंतर त्यांना मुंबई महानगरपालिकेत अधिकाऱ्याची नोकरी मिळाली. याच दरम्यान मुंबई गुजराती लोकांचं धंद्यातील वर्चस्व आपणही काहीतरी करू म्हणून त्यांनी वेगवेगळे उद्योग करायला सुरुवात केली. परीक्षा पास झाल्यापासून महानगरपालिकेतील नोकरी सोडेपर्यंत हे उद्योग सुरू होते. विशेष अशी अपेक्षा ठेवण्याचा प्रश्नच नव्हता. दादर स्टेशनच्या समोरच्या एका खोलीत कोहिनूर क्लासेस ला सुरुवात करण्यात आली. १९६१ मध्ये महानगरपालिकेतील नोकरी सांभाळ जोशी सरांनी सुरू केलेल्या कोहिनूर क्लासेस ना हळूहळू बसवला. मुलांकडे शिक्षण असलं तरी व्यावहारिक ज्ञान नाही हे जोशी सरांनी अचूक ओळखलं आणि १९६७ मध्ये कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट ची स्थापना केली. रेडिओ दुरुस्ती पर्यंत सगळं काही करण्याचं ज्ञान कोहिनूरच्या छताखाली विद्यार्थ्यांना मिळू लागले. त्यानंतर त्यांनी व्यवसायासाठी गाडी घेतली होती. भाचे सुधीर जोशी यांना हाताशी घेत त्यांनी गाडी भाड्याने द्यायला सुरुवात केली. गाडीवर कधी ड्रायव्हर नसला तर जोशी सर स्वतः ड्रायव्हर म्हणून जायचं.

एकदा श्रीकांत ठाकरेंना बाळासाहेबांच्या भाषणासाठी पुण्याला जायचं होतं. त्यांच्याकडे गाडी नव्हती म्हणून त्यांनी जोशी सरांकडून भाड्याने गाडी घेतली आणि गाडी चालवायला मनोहर जोशी स्वतः आले या प्रवासात मनोहर जोशींचे राजकीय समज पाहून श्रीकांत ठाकरे प्रभावित झाले. पुढे एकदा बाळासाहेबांनी जोशी सरांकडून भाड्याने गाडी घेतली जातात योग्य वेळी योग्य ठिकाणी पोहोचण्याचा टाइमिंग सरांना जमलं होतं बाळासाहेबांच्या भेटीनंतर जोशी सरांचा पॉलिटिकल आलेख वाढू लागला. सेनेच्या गुंडगिरी प्रवृत्ती मध्ये जोशी सरांसारख्या वाईट कॉलरचा मूल्य अधिक होतं. त्यामुळे राजकारणात जोशी सरांची किंमत वाढत गेली. तो पर्यंत शहरात बांधकाम व्यवसायात कोहिनूरने प्रचंड मोठी झेप घेतली. मुंबई, चेन्नईमध्ये फाईव्ह स्टार हॉटेल उभे केले. ऊर्जा, मेडिकल, क्रिकेट कोचिंग प्रत्येक क्षेत्रात कोहिनूरने जम बसवला.

राजकीय जीवनात हे मनोहर जोशी एका मागोमाग एक गडसर करत गेले. मुंबई महानगरपालिकेत त्यांनी नगरसेवक म्हणून एन्ट्री मारले. महापौर पद ही भूषवलं. शिवसेनेत त्यांची पत वाढत होती. बाळासाहेबांचा त्यांच्यावर असलेला विश्वास आणि त्यांनी शिवसैनिकांमध्ये मिळवलेले लोकप्रियता यामुळे जोशी सर आमदार झाले. त्यांनी विरोधी पक्षनेते पद ही भूषवले. त्यांच्यासाठी सगळ्यात मोठा सन्मान होता तो म्हणजे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाचा. १९९५ साली मुख्यमंत्रीपदी कोण विराजमान होणार याची चर्चा सुरू होती. सुधीर जोशींच्या नावाला सगळ्यांची समंती असताना एका रात्रीत सूत्र फिरवत त्यांनी शिवसेनेचा पहिला मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आणि मनोहर जोशींच्या कपाळाला मुख्यमंत्री पदाचा गुलाल लागला. त्यांचात कार्यकाळात त्यांनी राज्यात नव शैक्षणिक धोरण राबवले.

रस्ते आणि उड्डाणपुलाची कित्येक काम केली. हाडाचे शिक्षक असलेले मनोहर जोशी मुख्यमंत्री पदाचा कारभार कंपनीच्या सीईओच्या शिस्तीप्रमाणे पार पाडत असत. त्यांच्यावर प्रशासनातले सगळे अधिकारी मर्जी सांभाळून असले तरी, शिवसेनेच्या नेते मंडळींमध्ये मात्र याबद्दल नाराजी होती. अर्थातच सत्तेचा रिमोट कंट्रोल हातात ठेवणाऱ्या बाळासाहेबांपर्यंत हे पोहोचले होते. पुण्यातील जागा प्रकरणामध्ये बाळासाहेबांनी मनोहर जोशींना राजीनामा देण्याचे आदेश दिले. बाळासाहेबांचे पत्र आल्या आल्या राजीनामा तयार केला आणि राज्यपालांकडे सोपवला.

मुख्यमंत्रीपद सोडल्यानंतर जोशी सरांना खासदार, लोकसभेचे सभापती अशा पदांवर संधी मिळाली. त्यांचं नाव अगदी उपराष्ट्रपती पदाच्या शर्यती देखील आले होते. परंतु २००४ मध्ये त्यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव झाला त्यांना राज्यसभेवर पाठवत डॅमेज कंट्रोल करण्यात आले. आणि इथूनच जोशी सरांचा डाऊन फॉल सुरू झाला. त्यांच्या समर्थकांना हे तिकीट नाकारण्यात आले मनोहर जोशींचा मातोश्री वरचा वावर वाढला त्यांनी सूत्र आपल्या हातात घेण्याचे प्रयत्न करून पाहिले उद्धव ठाकरेंमध्ये जाहीर कार्यक्रमात जोशी सरांनी उद्धव ठाकरेंवर नाव न घेता टीका केली. दसरा मेळाव्यात त्यांच्या विरुद्ध घोषणाबाजी झाल्याने जोशी सरांना स्टेजवरून काढता पाय घ्यावा लागला. त्यानंतर मात्र जोशी सर सक्रिय राजकारणातून बाजूलाच झाले. फटाके आणि दुध विकणारा मुलगा महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होऊ शकते हे त्यांनी दाखवून दिले. अशा या मनोहर जोशी सरांना भावपूर्ण श्रद्धांजली !

## एमएचटी-सीईटी परीक्षा केंद्राच्या ठिकाणी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ लागू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**


डॉ. राजा दयानिधी

**सांगली :** सांगली जिल्ह्यात दि. २६ ते २९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत डीर्श्रि खपीशिर्ली व णर्शिी ऊर्ळींळीळेप उश्रशीज्ञ या पदांची सरळसेवा परीक्षा तीन परीक्षा केंद्रावर सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत घेण्यात येणार आहे. परीक्षा केंद्राच्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी परीक्षा केंद्राच्या ठिकाणी इमारतीपासून १०० मीटर सभोवतालच्या परिसरात परीक्षा कालावधीत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ लागू केले असून पुढील कृत्यांना मनाई केली आहे.

परीक्षा वेळेत परीक्षेसंबंधी अधिकारी / कर्मचारी व परीक्षेस येणारे विद्यार्थी तसेच त्यांचे लेखनिक वगळता इतर कोणत्याही चार किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना परीक्षा केंद्राच्या ठिकाणी फिरण्यास, एकत्रित गटागटाने फिरणे व उभा राहण्यास मनाई केली आहे. तसेच परिक्षा केंद्राच्या परिसरातील झेरॉक्स मशिन, टेलिफोन बुथ, फॅक्स मशिन, ध्वनीक्षेपक यांचा परिक्षा संदर्भात कोणत्याही गैरप्रकारासाठी वापरण्यास मनाई केली असून परिक्षा केंद्रात विद्यार्थी तसेच त्यांचे लेखनिक यांना मोबाईल, पेजर, ब्लूटूथ, वायफाय डिव्हाईस, डिजिटल कॅमेरा, स्मार्ट वॉच, इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस व डिजिटल डिव्हाईस नेण्यास मनाई केली आहे.सदर परीक्षा पद्मभूषण वसंतरावदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सांगली-तासगाव रोड, बुधगाव ता. मिरज, टेकवेअर टेक्नोलॉजी, विठ्ठल पाटील पॉलीटेक्निक, इनामधामणी, सांगली व वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज न्ड रिसर्च, भारती विद्यापीठ जवळ सांगली-मिरज रोड वान्लेसवाडी सांगली या महाविद्यालयाच्या ठिकाणी दि. २६ ते २९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत होणार आहे.

हा आदेश कायदेशिर कर्तव्य बजावित असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना व धार्मिक विधी यांना लागू राहणार नाही, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी जारी केले आहेत.

## महाराष्ट्रातून राज्यसभेवर सहा उमेदवारांची निवड

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्यातील सहा उमेदवारांची राज्यसभेच्या सदस्यपदी निवड झाली आहे. यामध्ये भारतीय जनता पक्षाच्या मेधा कुलकर्णी, अजित गोपछडे, अशोक चव्हाण (माजी मुख्यमंत्री) आणि शिवसेनेचे मिलिंद देवरा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) प्रफुल्ल पटेल, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे चंद्रकांत हंडोरे यांची महाराष्ट्रातून राज्यसभेवर निवड झाली.

राज्यसभेच्या १५ राज्यातील ५६ जागांसाठी २७ फेब्रुवारी २०२४ रोजी निवडणूक होणार होती. राज्यात उमेदवारीचा अर्ज मागे घेण्याची तारीख २० फेब्रुवारी होती. राज्यसभेवर महाराष्ट्राच्या सहा जागांसाठी सहा अर्ज प्राप्त झाल्याने, या सहा जणांची निवड करण्यात आली आहे. २ एप्रिल २०२४ मध्ये राज्यसभा सदस्यांची मुदत संपल्यानंतर या उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे राज्य विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## जरांगे आणि बारसकर वाद हा वैयक्तिक : उदय सामंत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** मनोज जरांगे पाटील आणि अजय बारसकर महाराज यांच्यातील वाद हा वैयक्तिक असून त्यामध्ये सरकारला खेचू नये. त्या दोघांमधील वाद हा वैयक्तिक असून त्यात सरकारचा काडीमात्र संबंध नाही. त्यात सरकारला पडण्याची गरज नाही. त्यांच्या या वादात नाहक सरकारला ओढू नये, अशी प्रतिक्रिया मंत्री उदय सामंत यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. मराठा समाजाला शिंदे, फडणवीस आणि अजित पवार सरकारने टिकणारे आरक्षण दिले. तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत हे आरक्षण दिल्याचे उदय सामंत म्हणाले. पुण्यामध्ये इंडिया आघाडीच्या मेळाव्यावर बोलताना इंडिया आघाडीने त्यांचा पंतप्रधानपदाचा उमेदवार जाहीर करून दाखवावा, असे सामंत यांनी आव्हान केले. दरम्यान, गुजरातमध्ये महानंदा डेअरी जाणार असल्याच्या चर्चेवर त्यांनी बोलण्यास नकार दिला.

## बेरोजगारांसाठी २८ फेब्रुवारी रोजी प्लेसमेंट ड्राईव्ह

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** खाजगी क्षेत्रात लहान, मध्यम व मोठे उद्योजक, कारखाने व हॉस्पीटल यांना आवश्यक असणारे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी व बेरोजगारीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सांगली कार्यालयामार्फत जिल्हास्तरीय प्लेसमेंट ड्राईव्ह-७ चे आयोजन बुधवार, २८ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत करण्यात आले आहे. याचा पात्र उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त जमीर करीम यांनी केले आहे.

प्लेसमेंट ड्राईव्ह-७ मध्ये एकूण ४ खाजगी नामवंत कंपन्या/ हॉस्पीटल सहभागी होणार असून एकूण १८९ पदे भरण्यात येणार आहेत. रिक्तपदांसाठी पात्र उमेदवारांनी हीींिः//ीक्षसरी.ारहरीुूरा.सीं.ळप या वेबपोर्टलवर अर्ज करुन प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बुधवार, २८ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेमध्ये जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सांगली या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून लाभ घ्यावा,

## भाटकीमध्ये सभामंडपाचे उद्घाटन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**


भटकी येथे सभा मंडप कामाचे उद्घाटन करताना उपस्थित गावचे सरपंच लालासो कोडलकर व उपस्थित मान्यवर

**म्हसवड/प्रतिनिधी :** माण-खटाव चे आमदार जयकुमार गोरे यांच्या स्थानिक विकास निधी मधून भाटकी गावातील मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या मारुती मंदिरासमोरील मोकळ्या जागेमध्ये सभामंडप कामाचे उदघाटन करण्यात आले.

सदरचे उदघाटन सरपंच लालासो कोडलकर व गावातील जेष्ठ नागरिक काशिनाथ शिर्के, राजाराम शिर्के, बाबासो शिर्के, हणमंत शिर्के व व्यंकटराव शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. या सभा मंडपकामासाठी युवा नेते व आमदार जयकुमार गोरे यांचे कट्टर समर्थक अंकुश मनोहर शिर्के यांनी विशेष प्रयत्न केले. माण-खटाव मतदारसंघांमधील पूर्व भागामध्ये असणाऱ्या गावांपैकी भाटकी गावावर आमदार साहेबांचे विशेष प्रेम आहे. त्यामुळे आमदार यांनी भाटकी गावासाठी या आर्थिक वर्षामध्ये आठ कोटी रुपयांची विकास कामे गावासाठी दिली असल्याचे मनोगत याप्रसंगी मान्यवरांनी व्यक्त केले.

या सभामंडपाचे उद्घाटन प्रसंगी भाटकी गावातील विकास सेवा सोसायटीचे चेअरमन राहुल देवकर, युवा नेते अंकुश शिर्के, ग्रामपंचायत सदस्य रावसाहेब शिर्के, अनिल शिर्के, रमेश पवार, दिनकर शिर्के, भारत सत्रे, विशाल शिर्के, नितीन शिर्के, किरण शिर्के इत्यादी मान्यवर उपस्थित होते.












दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस






## जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ आंदोलन, उपोषण, निदर्शने करण्यासाठी नियमावली

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ आंदोलन, उपोषण, निदर्शने करण्यासाठी नियमावली तसेच निर्बंध लागू केले आहेत. जिल्हाधिकारी डॉ.राजा दयानिधी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ अन्वये प्राप्त अधिकारानुसार याबाबत आदेश जारी केले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ आंदोलन, उपोषण, निदर्शने करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियमावली तसेच निर्बंध लागू केले आहेत. कोणतीही पूर्व परवानगी न घेता कोणत्याही व्यक्तीस / संस्थेस / संघटनेस जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारामध्ये कोणत्याही प्रकारचे आंदोलन / उपोषण / निदर्शने करता येणार नाहीत. आंदोलनकर्त्यांनी आंदोलनापूर्वी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील. आंदोलनकर्त्यांनी आंदोलनापूर्वी मंडप घालवायचा असलेस सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

आंदोलनकर्ते आंदोलनावेळी विजेचा वापर करणार असतील तर त्यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी चे नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

आंदोलनकर्ते आंदोलनावेळी स्पीकरचा वापर करणार असतील तर त्याबाबत विश्रामबाग पोलीस ठाणे यांचेकडून स्पीकरपरवाना घेणे बंधकारक राहील. वरील सर्व नाहरकत दाखले व परवानगी घेवून आंदोलनकर्ते हे अंतिम परवानगीसाठी पोलीस निरीक्षक, विश्रामबाग पोलीस ठाणे यांचेकडे अर्ज सादर करतील. आंदोलनकर्ते यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचे सुरक्षा भिंतीपासून ते रस्त्याच्या पांढऱ्या रब्लिंग ने केलेल्या रिमार्क पासून तीन फुटाचे आत पर्यंत तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचे सुरक्षा रक्षकांचे खोली पासून ते सुरक्षा भिंतीपर्यंत जागा वापरण्याची आहे. अन्य आंदोलनकर्ते सदर ठिकाणी आंदोलनास आलेस पूर्वीचे आंदोलकर्ते यांनी त्यांना जागा करून देण्याची आहे. आंदोलनाच्या ठिकाणी स्वत:चे स्तरावरून



डॉ.राजा दयानिधी

अग्नीप्रतिबंधक उपकरणांची व्यवस्था करणे आंदोलनकर्ते यांचेवर बंधनकारक असेल. पोलीस निरीक्षक, विश्रामबाग पोलीस ठाणे वरील सर्व बाबींच्या, रहदारीच्या व कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने योग्य ती पडताळणी करून आंदोलनकर्ते यांना उपोषण/आंदोलन करण्याबाबत अंतिम परवानगी देतील व त्याची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करतील. आंदोलनकर्ते यांनी उपरोक्त बाबींचे पालन न केल्यास पोलीस निरीक्षक, विश्रामबाग पोलीस ठाणे यांनी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधी यांनी आंदोलनकर्त्यांवर भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्याची आहे, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी जारी केले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय हे जिल्ह्याचे मुख्य प्रशासकीय कार्यालय असून जिल्ह्यातील सर्व नागरिक विविध कामासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात येत असतात. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दारासमोर विविध संघटना, संस्था व व्यक्तींकडून विविध प्रकारची आंदोलने केली जातात. ही आंदोलने करीत असताना मोठ मोठ्याने घोषणा देणे, मुख्य प्रवेशव्दारावर गर्दी करणे असे प्रकार घड़त आहेत. व त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात कामावर देणाऱ्या अधिकारी कर्मचारी तसेच सामान्य नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे आंदोलनकर्ते व इतर सामान्य नागरिक यांच्यात वाद होवून कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेकवेळा असेही निदर्शनास आले आहे की, आंदोलन करीत असताना आंदोलनकर्ते कोणतीही परवानगी घेत नाहीत. तसेच सदर ठिकाणी कोणतीही परवानगी न घेता मंडप घालतात, स्पीकर लावतात त्यामुळे सांगली-मिरज या मुख्य रहदारीच्या रस्त्यावर अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी वरीलप्रमाणे नियमावली तसेच निर्बंध लागू केले आहेत.

## वायफळे व तिकोंडी महसूल मंडळामध्ये दुष्काळ सदृष्य परिस्थितीच्या सवलती लागू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



**सांगली :** सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील वायफळे व जत तालुक्यातील तिकोंडी या दोन महसूल मंडळांमध्ये शासन निर्णय दि. १६ फेब्रुवारी २०२४ अन्वये दुष्काळ सदृष्य परिस्थिती घोषित करून मंजुरी दिलेल्या सवलतीच्या अनुषंगाने संबंधित प्रशासकीय विभागांनी त्वरीत कार्यवाही करावी, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी जारी केले आहेत.

तासगाव तालुक्यातील वायफळे व जत तालुक्यातील तिकोंडी या दोन महसूल मंडळांमध्ये शासनाने मंजुरी दिलेल्या जमीन महसुलात सुट, पिक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषि पंपाच्या चालु विजबिलात ३३.५ टक्के सुट, शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे या सवलतीच्या अनुषंगाने संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय यंत्रणाकरीता आवश्यक ते पूरक आदेश निर्गमित करावेत व आवश्यक निधी यंत्रणांना उपलब्ध करून द्यावा, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी जारी केले आहेत.

सांगली जिल्ह्यातील शिराळा, कडेगाव, खानापूर, मिरज या चार तालुक्यामध्ये शासन निर्णय दि. ३१ ऑक्टोबर २०२३ अन्वये मध्यम स्वरूपाचा दुष्काळ घोषित करून सवलती लागू करण्यात आल्या आहेत. दिनांक १० नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयान्वये कवठेमहांकाळ, वाळवा, जत, तासगाव, पलूस, आटपाडी या तालुक्यातील ३७ महसूल मंडळामध्ये दुष्काळ सदृष्य परिस्थिती घोषित करून विविध सवलती लागू केल्या आहेत. या व्यतिरिक्त दि. १६ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयान्वये तासगाव तालुक्यातील वायफळे व जत तालुक्यातील तिकोंडी या दोन महसूल मंडळामध्ये दुष्काळ सदृष्य परिस्थिती घोषित करून विविध सवलती लागू केल्या आहेत.

## परकीय थेट गुंतवणुकीत पुन्हा महाराष्ट्र आघाडीवर : देवेंद्र फडणवीस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नागपूर :** राज्यातील उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर राहावा यादृष्टीने अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प उभारण्यासाठी आम्ही पायाभूत सुविधांवर भर दिला. एक दूरदृष्टी घेऊन काम उभे केले. या बळावरच महाराष्ट्र राज्य भारतात आघाडीवर आणले होते. मध्यंतरी हे लयाला गेलेले वैभव आम्ही पुन्हा राज्याला प्राप्त करुन दिले असून परकीय थेट गुंतवणुकीतील ४५ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात झाल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महाराष्ट्र शासन व पेर्नोड रिकार्ड यांच्यात हॉटेल रॅडिसन ब्ल्यू येथे सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, पेर्नोड रिकार्ड इंडियाचे सीईओ जीन टुबूल, राज्य उत्पादन शुल्क आयुक्त विजय सुर्यवंशी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, प्रसन्न मोहिले आदी मान्यवर उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या हितासाठी दूरदृष्टी ठेवून राज्यातील अन्नप्रक्रिया उद्योगाला चालना देत महाराष्ट्र शासन वाटचाल करीत आहे. कृषी क्षेत्रासह शेतकऱ्यांचेही आर्थिक उत्पन्न वाढावे या उद्देशाने



देवेंद्र फडणवीस

अन्नप्रक्रिया उद्योग महत्त्वाचे असून बुटीबोरी येथे ८८ एकर क्षेत्रावर साकारणारा पेर्नोड रिकार्ड इंडिया डिस्टिलरी प्रकल्प महत्त्वाचा आहे. सुमारे ६ हजार कोटी रुपयांचा गुंतवणुकीतून हा प्रकल्प रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणारा ठरेल असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

राज्याच्या विकासासाठी सात क्षेत्र निवडली आहेत. यात कृषीक्षेत्र, स्टार्टअप, आर्टीफिशियल इंटिलीजन्स यावर आम्ही भर दिला आहे. नागपूर येथे आर्टीफिशियल इंटिलीजन्सचे सेंटर ऑफ एक्सलन्स उभारण्यासाठी गुगलसमवेत काम सुरु असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्याच्या समतोल विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. रायगड हे राज्यातील गुंतवणुकीचे आकर्षण ठरले आहे. रायगडापासून कोकणातील विकासाच्या वाटा भक्कम केल्या जात आहेत. पुणे, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात विविध प्रकल्पांची उभारणी केली जात आहे. मुंबई, पुणे पाठोपाठ विदर्भ मराठवाड्यातील उद्योगाला, कृषी क्षेत्राला चालना मिळावी यासाठी येत्या दोन आठवड्यात पावर सबसिडी धोरण जाहीर केले जात असल्याचे सुतोवाच त्यांनी केले.

## रायगडवर शरद पवारांच्या राष्ट्रवादीची 'तुतारी' वाजणार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीवर दावा सांगितला. त्यानंतर केंद्रीय निवडणुक आयोगासमोर कागदपत्रे आणि पुराव्यांवरून खरी राष्ट्रवादी काँग्रेस ही अजित पवार यांचीच असल्याचा निकाल देण्यात आला. पुढे अजित पवार गटाकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे मूळ नाव आणि चिन्ह बहाल करण्यात आले. त्यानंतर आयोगाने शरद पवार गटाला 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार' असे नवीन नाव आणि 'तुतारी' हे नवीन चिन्ह दिले. केंद्रीय निवडणुक आयोगाने दिलेल्या याच चिन्हाचे आज (दि.२४) किल्ले रायगड येथे अनावरण करण्यात येणार आहे, अशी माहिती शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने एक्स पोस्ट करत दिली आहे.

'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार' या पक्षाने पोस्टमध्ये म्हटले आहे की, आता अवघा देश होणार दंग,आदरणीय खा. शरद पवार साहेबांच्या साथीने फुंकलं जाणार विकासाचं रणशिंग! 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष–शरदचंद्र पवार'ला मिळालेल्या 'तुतारी वाजवणारा माणूस' या पक्ष चिन्हाचा अनावरण सोहळा, दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ रोजी किल्ले रायगड येथे आयोजित करण्यात आला आहे.चला, छत्रपती शिवरायांच्या साथीने तुतारीचा नाद दाही दिशा घुमवूया! असे आवाहन शरद पवार गटाने केले आहे.




शरद पवार यांच्या 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार' या पक्षाला तुतारी हे निवडणूक चिन्ह मिळाले आहे. निवडणूक आयोगाने हे चिन्ह देण्यासंदर्भात आदेश काढले आहेत. पुढील आदेश येईपर्यंत आता येणाऱ्या निवडणुकीत शरद पवार गटाला आता हे चिन्ह वारण्याचे आदेश देण्यात आले आहे. 'तुतारी' पक्ष चिन्ह मिळताच दिल्लीच्या तख्ताला हादरवून सोडण्यासाठी हीच 'तुतारी' पुन्हा एकदा रणशिंग फुंकण्याकरिता सज्ज आहे! अशा आशयाची पोस्ट शरद पवार गटाच्या वतीने सोशल मीडियावर करण्यात आली.













## जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** विविध आंदोलने, आगामी सण, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था परिस्थिती अबाधित रहावी या करीता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सन १९५१ च्या महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सांगली जिल्हा स्थलसिमा हद्दीत दि. २३ फेब्रुवारी २०२४ ते दि. ८ मार्च २०२४ अखेर पर्यंत खालील कृत्ये करण्यास मनाई केली आहे.

या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या अथवा लाठ्या किंवा शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा क्षेपणास्त्रे किंवा सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे आणि तयार करणे, व्यक्तीचे अथवा प्रेते



किंवा आकृत्या किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्ये वाजविणे या कृत्यांना मनाई केली आहे. तसेच ज्याच्या योगाने शांतता व सुव्यवस्था आणि सार्वजनिक मालमत्तेस धोका निर्माण होईल किंवा सभ्यतेला बाधा येईल अशा पध्दतीने हावभाव करणे, फलक चित्रे किंवा चिन्हे तयार करणे, त्यांचे प्रदर्शन करणे आणि प्रसारीत करण्यास मनाई केली आहे. जिल्ह्यात परवानगीशिवाय पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर एकत्र जमण्यास मनाई केली आहे.

हा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावीत असलेल्या शासकीय कर्मचारी, धार्मिक विधी, अंत्यविधी व परीक्षा यांना लागू राहणार नाही. हा आदेश दि. २३ फेब्रुवारी २०२४ रोजीचे ११.०० वाजल्यापासून ते दि. ८ मार्च २०२४ रोजीचे २३.५९ वाजेपर्यंत अंमलात राहील, असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिले आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा राज्यकारभार प्रेरणादायक

## उपमुख्यमंत्री अजित पवार : अहिल्यादेवींच्या पुर्णाकृती पुतळ्याचे गंगापूर येथे अनावरण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**छत्रपती संभाजीनगर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी जनता सुखी, समाधानी व सुरक्षित रहावी, सामान्य माणसांना न्याय मिळावा यासाठी राज्यकारभार केला. अहिल्यादेवींनी केलेला राज्यकारभार हा प्रेरणा देणारा आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज गंगापूर येथे केले.

गंगापूर येथील जामगाव टी पॉइंट येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते आज झाले. आमदार सतीश चव्हाण, माजी आमदार कैलास पाटील, भूषणसिंह राजे होळकर, 'राजे यशवंतराव होळकर प्रतिष्ठान' चे अध्यक्ष रावसाहेब तोगे, माजी नगराध्यक्ष संजय जाधव, अरुण रोडगे यांच्यासह पदाधिकारी व प्रशासनातील अधिकारी, नागरिक उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्यात महिलांचा सन्मान केला. त्याच भोसले घराण्यात पुढे महाराणी ताराबाई व होळकर घराण्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या कर्तबगार महिलांनी उत्तम राज्यकारभार केला. त्यांचा राज्यकारभार आजही प्रेरणादायक आहे. ते पुढे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे जन्मगाव असलेल्या चौंडी गावाच्या विकासाचा आराखडा तयार करण्याबाबत अहमदनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. सर्वांना अभिमान वाटावा, असे स्मारक चौंडीत उभारण्यात येईल व त्यासाठी भरीव निधी दिला जाईल. पुणे जिल्ह्यातील वाफगाव येथे किल्ला संवर्धनासाठी तातडीने निधी देऊ असेही त्यांनी सांगितले. अहिल्यादेवींनी बांधलेले बारव तसेच त्यांनी केलेल्या अन्य कामांचे जतन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील. बारामतीत एक हजार कोटीच्या निधीतून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची उभारणी केली असून या वास्तूला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव दिले आहे,असेही श्री. पवार यांनी सांगितले. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अहिल्यादेवींचे स्मरण व्हावे, हाच त्यामागील हेतू आहे.

आर्थिक व्यवहार काटेकोर असेल तर त्या राज्याची प्रगती होते, हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या राज्य काराभारावरून दिसते. प्रचंड संघर्षातून त्यांनी काम केले. त्याचा हाच आदर्श आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

भूषणसिंह राजे होळकर म्हणाले की, गंगापूर येथे उभारण्यात आलेले पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक आपल्याला प्रेरणा देणारे ठरणार आहे. अहिल्यादेवींचे व्यवस्थापन, सैन्यांची व्यवस्था, मानवतावादी विचार, तसेच रयतेकडे त्यांचे असलेले लक्ष या बाबी महत्त्वाच्या असून त्यांचे परराष्ट्र धोरणही अत्यंत महत्त्वाचे आहे. आदर्श राज्य कसे असावे , हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवले असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

यावेळी आमदार सतीश चव्हाण, माजी आमदार कैलास पाटील, श्री. रावसाहेब तोगे, माजी सभापती अरूण रोडगे यांचीही भाषणे झाली. कार्यक्रमास परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**गंगापूर : येथील जामगाव टी पॉइंट येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण प्रसंगी उपस्थित उपमुख्यमंत्री अजित पवार व उपस्थित मान्यवर**

# ८८ लाखांच्या फसवणुक प्रकरणी ठकसेन दाम्पत्यास अटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** गुंतवणूक रकमेवर जादा परतावा देण्याचे आमिष दाखवून ८८ लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या कुलदीप चंद्रकांत काशीद (वय ३७) व पत्नी स्मिता कुलदीप काशीद (दोघेही रा. कमानवेस, मंगळवार पेठ, मिरज) यांना आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली.

काशीद व त्याची पत्नी स्मिता या दोघांनी के. के. कन्सल्टन्सी स्टॉक मार्केट रिसर्च अण्ड अनालिसीस नावाची कंपनी २०२१ साली स्थापन केली होती. त्यामध्ये पैसे गुंतवल्यास त्यावर दरमहा ७ ते ९ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखविले. फिर्यादी आरती होसपुरे आणि काही गुंतवणूकदारांनी ५७ लाख ५० हजार रुपये कंपनीत गुंतविले. सुरुवातीला गुंतवणूकदारांना १३ लाख ६१ हजार २०० रुपये परतावा दिला. नंतर परतावा देण्यास टाळाटाळ केली. गुंतवणूकदारांची ४३ लाख ८८ हजार ८०० रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार पोलिस अधीक्षकांकडे केली होती. आर्थिक गुन्हे शाखेकडे तपास देण्यात आला.

मिरज शहर पोलिस ठाण्यात काशीद दांपत्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासात दांपत्याने २०२१ते दि. १९ जानेवारी २०२४ या कालावधित १३ गुंतवणूकदारांची ८८ लाख ४२ हजार ३०० रुपयांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले. संशयित स्मिता हिला दि. १ फेब्रुवारी रोजी पोलिसांनी अटक केली होती. ती न्यायालयीन कोठडीत आहे. पसार झालेला कुलदीप हा मिरजेत येणार असल्याची माहिती मिळाली. दि. २२ रोजी रात्री पोलिसांनी कुलदीप याला अटक केली. न्यायालयात हजर केले असता त्याला २ मार्चपर्यंत पोलिस कोठडी दिली आहे.




# ज्येष्ठ नागरिकांना 'घरातून मतदान' उपक्रमाद्वारे मतदानाची सुविधा देणार : श्रीकांत देशपांडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** वयोमान, आजारपणामुळे अनेक ज्येष्ठ मतदारांना त्यांचा मतदानाचा अधिकार बजावताना अडचणी निर्माण होतात. त्यामुळे मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम होतो. हे टाळण्यासाठी भारत निवडणूक आयोगाकडून ८० वर्षापुढील ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांसाठी 'घरातून मतदान' या विशेष उपक्रमाद्वारे घरातूनच मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती अपर मुख्य सचिव तथा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

श्री.देशपांडे म्हणाले, अनेकदा ज्येष्ठ नागरिकांचे वयोमान, त्यांचे आजारपण या कारणांमुळे त्यांना मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होता येत नाही. मतदानापासून कोणीही वंचित राहू नये आणि ज्येष्ठ नागरिकांना मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होता यावे यासाठी हा उपक्रम निवडणूक आयोगातर्फे प्राधान्याने राबविण्यात येत आहे.



या उपक्रमांतर्गत मतदार यादीमध्ये चिन्हांकित केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना १२-डि क्रमांकाचा अर्ज पुरविण्यात येणार असून तो भरुन निवडणूक घोषित झाल्यानंतर पाच दिवसाच्या आत जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे. जिल्हाधिकारी या मागणीवर अंतिम निर्णय घेणार असून त्यानंतर प्रत्यक्ष मतदानासाठी तात्पुरत्या मतदान केंद्राची उभारणी संबधित मतदाराच्या घरी करण्यात येणार आहे. ज्येष्ठ मतदारांसाठी ही एक संधी असली तरीही ज्यांना शक्य आहे अशा ज्येष्ठ नागरिकांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे आणि इतरांना आदर्श घालून द्यावा, असे आवाहन श्री.देशपांडे त्यांनी केले.

ते पुढे म्हणाले, निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव असून, मतदानामुळे लोकशाही बळकट होते. या प्रक्रीयेत सर्वांनी सहभागी होण्यासाठी निवडणूक आयोगातर्फे विशेष प्रयत्न करण्यात येत आहे.

निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्यानंतर वगळण्यात आलेल्या मतदार यादीतील नावांची स्वतंत्र यादी ठेवण्यात येणार आहे. निवडणूक प्रक्रिया, मतदान प्रक्रिया तसेच मतमोजणीची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी आणि प्रक्रियेतील त्यांचा सहभाग वाढावा आणि पर्यायाने मतदानाचा टक्का वाढावा यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर घेण्याचे निवडणूक आयोगाने नियोजन केले आहे.

निवडणूक आयोगाने केलेल्या नवीन बदलांची कोटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत असून, त्यासाठी जिल्हानिहाय आढावा घेण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

निवडणूक कार्यासाठी कर्तव्यावर असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना मतदान करता यावे यासाठी, सुविधा केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.

निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता असावी यासाठी सूक्ष्म निरीक्षकांची नियुक्ती, वेब कास्टींग, संवेदनशील मतदान केंद्राची निगराणी, आदर्श आचार संहितेच्या भंगाच्या तक्रारींबाबत सी-व्हीजील पच्या माध्यमातून कार्यवाही आदी बाबींवर भर देण्यात आला आहे. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सुचनेनुसार निवडणुका मुक्त आणि नि:ष्पक्षरितीने पार पडतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# बहुजनांनी जागे होवून एकीची वज्रमुठ आवळावी : राज राजापूरकर

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** बहुजनांना आपसात लढवत ठेवून आपले इप्सित साध्य करू पाहणाऱ्यांना वेळीच रोखले नाही तर देशाचे स्वातंत्र्य लोकशाही आणि संविधान धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. यासाठी बहुजनांनी जागे होवून एकीची वज्रमुठ आवळावी. असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष राज राजापुरकर यांनी केले.

बहुजनांना आपसात लढवत ठेवून आपले इप्सित साध्य करू पाहणाऱ्यांना वेळीच रोखले नाही तर देशाचे स्वातंत्र्य लोकशाही आणि संविधान धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. यासाठी बहुजनांनी जागे होवून एकीची वज्रमुठ आवळावी. असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष राज राजापुरकर यांनी केले.

बहुजन जुडेगा, देश बढेगा या संकल्पनेतून महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असलेल्या राज राजापूरकर यांनी दि. २२ फेब्रुवारी रोजी सांगली जिल्ह्याचा दौरा केला. आटपाडीत मुक्कामी आलेल्या राज राजापूरकर यांच्या समवेतच्या सर्व सहकाऱ्यानी आटपाडी पासून सांगली जिल्ह्याच्या रॅलीची सुरुवात केली. मोटार सायकल रॅलीला झेंडा फडकावून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आटपाडी तालुका अध्यक्ष आनंदरावबापू पाटील यांनी प्रारंभ करून दिला. आटपाडी शहरातील महात्मा जोतिबा फुले, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून नगरपंचायत समोर संपन्न झालेल्या चौक सभेत बोलताना राज राजापुरकर यांनी हे आवाहन केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष सादिक खाटीक, प्रदेशचे राज्य विस्तारक सलीम बेग नवी मुंबई, सांगली जिल्हाध्यक्ष जालींदर कटरे, जिल्हा कार्यकारणी सदस्य विष्णुपंत चव्हाण, महिला राष्ट्रवादीच्या जिल्हा उपाध्यक्षा अनिता पाटील, तालुका युवक अध्यक्ष सुरज पाटील, तालुका उपाध्यक्ष दत्ता यमगर , समाधान भोसले, युवक उपाध्यक्ष प्रशांत मोटे,ओबीसी जिल्हा सरचिटणीस विश्वजीत सरगर, तालुका अध्यक्ष सागर पुजारी, उपाध्यक्ष ओबीसी शरद सोन्नुर, जिल्हा कार्यकारणी सदस्य मुन्ना मुलाणी, धुळाजी ठेंगले, वसंतराव जगताप गोमेवाडी, असिफ उर्फ बाबु खाटीक, अमीर खाटीक नाथकलंदर खाटीक, रहिमान खाटीक असिफ कुरेशी, कुर्बानहुसेन खाटीक, शब्बीर मुलाणी इत्यादी अनेक जण यावेळी उपस्थित होते. या रॅलीने आटपाडी ओढापात्र आणि बाजार पटांगण येथील मटन चिकन मासे भाजीपाला वगैरे बहुजनांच्या व्यवसायाच्या ठिकाणी भेट देवून तेथील झेंडे लावण्यात आले.



**आटपाडी : बहुजन जुडेगा, देश बढेगा या संकल्पनेतून महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असलेल्या राज राजापूरकर हे आटपाडी येथे मार्गदर्शन करताना. यावेळी उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी**




# जो रूटचे शतक, इंग्लंड ७ बाद ३०२

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**रांची :** येथे खेळल्या जात असलेल्या चौथ्या कसोटीत जो रूटच्या शतकाच्या जोरावर इंग्लंडने पहिल्या डावात आपला संघर्ष सुरूच ठेवला. पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत इंग्लिश संघाने ७ बाद ३०२ धावा केल्या आहेत. रूट (नाबाद १०६) आणि ऑली रॉबिन्सन (नाबाद ३१) क्रीजवर आहेत. दोघांमध्ये ५७ धावांची भागीदारी झाली आहे.

रांची कसोटीचे पहिले सत्र भारताच्या नावावर राहिले. पदार्पणाचा सामना खेळणार्या वेगवान गोलंदाज आकाशदीपने इंग्लंडची आघाडीची फळी उखडून टाकली. त्याने बेन डकेट (११), ऑली पोप (०) आणि जॅक क्रोली (४२) यांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले. त्यानंतर फिरकीपटू अश्विनने आपली जादू दाखवली आणि जॉनी बेअरस्टोला (३८) तंबूचा रस्ता दाखवला, तर रवींद्र जडेजानेही बेन स्टोक्सला (३) माघारी धाडले.

उपहारापर्यंत पहिल्या सत्रात इंग्लंडने पाच विकेटस् गमावून ११२ धावा केल्या होत्या. यानंतर दुसर्या सत्रात चहापानाच्या वेळेपर्यंत रूट आणि बेन फॉक्स यांनी एकही विकेट पडू दिली नाही. त्या सत्रात दोघांनी मिळून ८६ धावा जोडल्या. तिसर्या सत्रात सिराजने टीम इंडियाचे कमबॅक केले. त्याने रूट आणि फॉक्सची ११३ धावांची भागीदारी मोडली. फॉक्सचे अर्धशतक हुकले. तो ४७ धावा करून सिराजच्या चेंडूवर झेलबाद झाला. त्याचवेळी टॉम हार्टले १३ धावा करून सिराजच्या गोलंदाजीवर क्लीन बोल्ड झाला. यानंतर रूटने ऑली रॉबिन्सनसह इंग्लंडचा डाव पुन्हा सांभाळला आणि कसोटी कारकिर्दीतील ३१ वे शतक झळकावले. दोघांमध्ये अर्धशतकी भागीदारी झाली आहे. तिसर्या सत्रात इंग्लंडने २९ षटकांत दोन गडी गमावून १०४ धावा केल्या. भारताकडून आकाशने सर्वाधिक तीन विकेटस् घेतल्या आहेत. त्याचवेळी सिराजला दोन विकेटस् मिळाल्या. रवींद्र जडेजा आणि अश्विनला प्रत्येकी एक विकेट मिळाली.

इंग्लिश फलंदाज जो रूटने रांची कसोटीच्या पहिल्याच दिवशी शानदार शतक झळकावून इतिहास रचला. यजमान भारताविरुद्धच्या ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या ३ कसोटी सामन्यांमध्ये जो रूटला धावा काढण्यासाठी खूप संघर्ष करावा लागला. मात्र चौथ्या कसोटीत त्याने बॅझबॉल स्टाईलला तिलांजली देत आपला नैसर्गिक खेळ केला. या सावध खेळीतून त्याने भारताविरुद्ध शतक झळकावले. हे त्याचे कसोटी कारकिर्दीतील ३१ वे शतक ठरले आहे.



**राची : येथे भारत-इंग्लड यांच्यात खेळवण्यात येत असलेल्या कसोटीमध्ये इंग्लडच्या जो रूटने शतक झळकाविले**

